अलिबाग (जि.रायगड), नंदुरबार, सातारा व मुंबई महानगर परीसर येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० रुग्ण खाटांचे रुग्णालय सुरु करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक एमईडी-२०१०/प्र.क्र.७६ (अ)/२०१०/शिक्षण-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ३१ जानेवारी, २०१२

प्रस्तावना : सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ४१ वैद्यकीय महाविद्यालये असून या सर्वांची एकत्रित विद्यार्थी क्षमता ४६१० इतकी आहे. त्यामध्ये राज्य शासनाची १४, केंद्र शासनाची २, महानगर पालिकेची ४ व खाजगी विनाअनुदानीत ११ तसेच अभिमत विद्यापीठांची १० वैद्यकीय महाविद्यालये आहेत. १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश क्षमता प्रतिवर्षी १६०० विद्यार्थी इतकी आहे. राज्य शासनातर्फे सन २००० पूर्वी ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये चालविण्यात येत होती. त्यावेळेस त्यांची प्रवेश क्षमता १३०० विद्यार्थी एवढी होती. राज्य शासनातर्फे २००२-२००३ मध्ये लातूर, अकोला व कोल्हापूर येथे तीन नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली. त्यानंतर गेल्या ८ वर्षांमध्ये एकही नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात आले नसल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश क्षमता १६०० एवढीच मर्यादित राहिलेली आहे. तसेच राज्याचा सन २०१०-११ चा अर्थसंकल्प विधीमंडळाला सादर करताना मा.मंत्री (वित्त) यांनी दि.२५ मार्च, २०१० रोजी केलेल्या भाषणामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा शासनाचा प्रस्ताव असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल अशी घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर अलिबाग (जि.रायगड), नंदुरबार, सातारा व मुंबई महानगर परीसर येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास केंद्र शासनाची मान्यता मिळण्यासाठी शासनामार्फत आवश्यकता प्रमाणपत्र देऊन भारतीय आयुर्विज्ञान परिषद अधिनियम, १९५६ मधील कलम-१० (अ) नुसार प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे. प्रस्तावित नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासोबत संलग्नीत ५०० रुग्ण खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषांनुसार सर्व बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केला होता. त्यास आता दि.२.१.२०१२ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:** शासन आता, केंद्रशासनाच्या व भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून अलिबाग (जि.रायगड), नंदुरबार, सातारा व मुंबई महानगर परीसर येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ५०० रुग्ण खाटांचे संलग्नीत रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देत आहे.

अलिबाग (जि. रायगड), नंदुरबार, सातारा व मुंबई महानगर परिसर या चार ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय सुरु करण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

अ) उक्त चारही महाविद्यालयात खालील प्रमाणे प्रवेश क्षमतेची निर्मिती करण्यात यावी.

१. राज्य शासनाच्या प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्यात येणाऱ्या जागा - ८५ टक्के

२. केंद्र शासनाच्या प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्यात येणाऱ्या जागा - १५ टक्के

ब) वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नीत रुग्णालया करिता प्रत्येकी - ५०० रुग्ण खाटा

क) या चार महाविद्यालयासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे विविध संवर्गातील पदे अंदाजपत्रकीय तरतूद करून विहित मार्गाने निर्माण करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

ड) सदर चार महाविद्यालयाशी संलग्नीत रुग्णालयासाठी या निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र "ब" विविध संवर्गातील पदे अंदाजपत्रकीय तरतूद करून विहित मार्गाने निर्माण करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

इ) या चार महाविद्यालयासाठी आवश्यक तसेच अतिरिक्त बांधकाम व बांधकाम खर्चास विवरणपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

फ) सदर चार प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली याच्या मानकानुसार पद निर्मिती, यंत्रसामुग्री, उपकरणे, आवर्ती खर्च, बाह्यस्त्रोत खर्च व नव्याने अनुषंगिक शैक्षणिक रुग्णालय निर्मितीसाठी येणारा एकूण अंदाजित खर्च रूपये १५०० कोटी ४५ लाख इतक्या रक्कमेस विवरण पत्र "ड" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आवश्यकता भासल्यास पूरक मागणीद्वारे निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सन २०११-१२ ते सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये आवश्यक ती अर्थसंकल्पिय तरतुद करून घ्यावी.

या चार महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालयाकरिता आवश्यक असणारी स्वच्छता, आहार, सुरक्षा, वस्त्र स्वच्छता ही सर्व कामे बाह्यस्त्रोतामार्फत राबविण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदरची कामे जाहीर निविदा प्रक्रियेमार्फत ठेकेदाराची नियुक्ती करून शासनाच्या पूर्व मान्यतेने करून घेण्यात यावीत.

४. सदर चार वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नित स्वतंत्र रुग्णालयांची निर्मिती होईपर्यंत संबंधीत ठिकाणच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सामान्य रुग्णालयातील रुग्ण खाटा शैक्षणिक प्रयोजनार्थ विनामूल्य वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३५/२०१२/व्यय-१३, दिनांक २७.१.२०१२ अन्वये सहमती घेऊन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(नि.ला.ढोले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार निर्माण भवन, नवी दिल्ली
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (पाच प्रती)
जिल्हाधिकारी, मुंबई/नंदुरबार/अलिबाग (जि.रायगड)/सातारा
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई/नंदुरबार/अलिबाग (जि.रायगड)/सातारा
उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक
जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, नंदुरबार/अलिबाग (जि.रायगड)/सातारा
सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये
अधिष्ठाता, महानगरपालिकेची वैद्यकीय महाविद्यालये, मुंबई/ठाणे
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/नोंदणी शाखाप्रमुख वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (शिक्षण-१)



Scanned with CamScanner

शासन निर्णय क्र.एमईडी-२०१०/प्र.क्र.७६ (अ)/२०१०/शिक्षण-१, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक ११ जानेवारी, २०१२ चे सहपत्र

## विवरणपत्र " अ "

### महाविद्यालयाकरिता आवश्यक पदे व त्यावरील पाच वर्षाचा अंदाजित खर्च

(रुपये कोटी)

| अ.क्र. | संवर्ग | | एका महाविद्यालयास आवश्यक पदे व अंदाजित खर्च | चार महाविद्यालयास अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग १ | पदे | २२ | ८८ |
| | | खर्च | १०.२० | ४०.८० |
| २ | वर्ग २ | पदे | ७० | २८० |
| | | खर्च | २२.७९ | ९१.१६ |
| ३ | वर्ग ३ | पदे | ९३ | ३७२ |
| | | खर्च | ७.९३ | ३१.७२ |
| ४ | वर्ग ३ (कंत्राटी) | पदे | १३९ | ५५६ |
| | | खर्च | ५.९३ | २३.७२ |
| ५ | वर्ग ४ (कंत्राटी) | पदे | ६५ | २६० |
| | | खर्च | १.५५ | ६.२० |
| ५ | विद्यावेतन | पदे | १२१ | ४८४ |
| | | खर्च | १४.९७ | ५९.८८ |
| एकूण | | पदे | ५१० | २०४० |
| | | खर्च | ६३.३७ | २५३.४८ |

****************************

शासन निर्णय क्र.एमइडी-२०१०/प्र.क्र.७५(अ)/२०१०/शिक्षण-१, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक ३१ जानेवारी, २०१२ चे सहपत्र

## विवरणपत्र "अ"

रुग्णालयाकरिता आवश्यक पदे व त्यावरील पाच वर्षाचा अंदाजित खर्च

(रुपये कोटी)

| अ.क्र. | संवर्ग | | रुग्णालयास आवश्यक पदे व अंदाजित खर्च | | | | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अलिबाग | नंदुरबार | सातारा | मुंबई | |
| १ | वर्ग १ | पदे | १ | १ | १ | ० | ३ |
| | | खर्च | ०.४५ | ०.४५ | ०.४५ | ० | १.३५ |
| २ | वर्ग २ | पदे | ८ | ८ | ८ | ३ | २७ |
| | | खर्च | १.५० | १.५० | १.५० | ०.४५ | ४.९५ |
| ३ | वर्ग ३ (नियमीत) | पदे | ४८७ | ४८७ | ४८७ | २४३ | १७०४ |
| | | खर्च | ४४.३७ | ४४.३७ | ४४.३७ | २२.२२ | १५४.६० |
| ४ | वर्ग ३ (करार) | पदे | ९९ | ९९ | ९९ | २९ | ३२६ |
| | | खर्च | ४.१३ | ४.१३ | ४.१३ | १.०३ | १३.४२ |
| ५ | वर्ग ४ (नियमीत) | पदे | २२ | २२ | २२ | १९ | ८५ |
| | | खर्च | १.०५ | १.०५ | १.०५ | ०.६९ | ३.८४ |
| ६ | वर्ग ४ (करार) | पदे | ४५५ | ४५५ | ४५५ | १८१ | १५४६ |
| | | खर्च | ९.६८ | ९.६८ | ९.६८ | ३.६० | ३२.६४ |
| | एकूण | पदे | १०७२ | १०७२ | १०७२ | ४७५ | ३६९१ |
| | | खर्च | ६१.१८ | ६१.१८ | ६१.१८ | २७.०६ | २१०.६० |

**************************

sitadkar Statment GR New govt Med College.doc

Scanned with CamScanner

शासन निर्णय क्र.एमइडी-२०१०/प्र.क्र.७५(अ)/२०१०/शिक्षण-१, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक ११ जानेवारी, २०१२ चे सहपत्र

# विवरणपत्र "ड"

(कोटी रुपये)

| अ. क्र. | बाबींचा तपशील | | सन २०११-२०१२ | सन २०१२-२०१३ | सन २०१३-२०१४ | सन २०१४-२०१५ | सन २०१५-२०१६ | [illegible] महाविद्यालय (वार्षिक) | [illegible] महाविद्यालय (वार्षिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इमारती व बांधकाम | अलीबाग | १५.५९ | ५०.०० | २५.०० | २०.०० | ५.०० | १३५.२९ | |
| | | नंदुरबार | १५.५९ | ५०.०० | २५.०० | २०.०० | ५.०० | १३५.२९ | ५०७.८८ |
| | | सातारा | १५.५९ | ५०.०० | २५.०० | २०.०० | ५.०० | १३५.२९ | |
| | | मुंबई | १०.७१ | ५०.०० | १०.०० | ५.०० | ५.०० | १००.३१ | |
| | | एकूण (अ) | १३७.४८ | २००.०० | ८५.०० | ६५.०० | २०.०० | ५०७.८८ | |
| २ | महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचारी - (ब) | | ६.३४ | ११.३१ | १४.७८ | १५.८७ | १५.८७ | ६३.३१ | २०३.८८ |
| ३ | कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी | अलिबाग | ५.१५ | ९.७१ | १३.९२ | १६.१९ | १६.२१ | ६२.२८ | |
| | | नंदुरबार | ५.१५ | ९.७१ | १३.९२ | १६.१९ | १६.२१ | ६२.२८ | २२०.३० |
| | | सातारा | ५.१५ | ९.७१ | १३.९२ | १६.१९ | १६.२१ | ६२.२८ | |
| | | मुंबई | १.०१ | ४.४६ | ६.५९ | ७.८७ | ७.५३ | २७.०६ | |
| | | एकूण (क) | १६.४६ | ३३.५९ | ४८.३५ | ५६.०४ | ५९.९९ | २२०.६० | |
| ४ | अनुवंशिक पदनिर्मिती (ड) | | ०.६५ | ०.६५ | ०.६५ | ०.६५ | ०.६५ | ० | ३.२५ |
| ५ | यंत्रसामुग्री उपकरणे | अलीबाग | १०.०० | २०.०० | ३०.०० | २५.०० | ५.०० | ९०.०० | |
| | | नंदुरबार | १०.०० | २०.०० | ३०.०० | २५.०० | ५.०० | ९०.०० | ३५२.०० |
| | | सातारा | १०.०० | २०.०० | ३०.०० | २५.०० | ५.०० | ९०.०० | |
| | | मुंबई | १०.०० | १५.०० | २५.०० | २५.०० | ५.०० | ८२.०० | |
| | | एकूण (इ) | ४०.०० | ७५.०० | ११५.०० | १००.०० | २०.०० | ३५२.०० | |
| ६ | यंत्रसामुग्री देखभाल (ई) | | ०.०० | ०.०० | २.०० | ३.०० | ४.०० | ९.०० | ३६.०० |
| ७ | आवर्ती खर्च (फ) | | ५.०९ | ५.६१ | ६.१४ | ६.७४ | ७.४३ | ३१.०३ | १२४.१२ |
| ८ | बाह्य स्त्रोत खर्च (ग) | | २.८९ | ४.८५ | ५.७३ | ६.६३ | ७.१३ | २७.६३ | ११०.५२ |
| | एकूण (अ+ब+क+ड+इ+ई+फ+ग) | | २०८.४१ | ३३२.६१ | २७८.६५ | २५३.३३ | १३०.८४ | १२०१.११ | १५९७.४५ |

****************

statement of New govt Med College.doc